३४

प्रा. फकरुद्दीन बेन्नूर : सहिष्णुतेचे महामेरू

■

कलीम अजीम

वीस ऑगस्टला प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांच्या ३ नवीन पुस्तकांचं प्रकाशन आणि त्यांच्या सामाजिक कार्याची पावती म्हणून त्यांना मानपत्र प्रदान सोहळा आयोजित केलेला होता. हा गौरव सोहळा श्रद्धांजली सभेत बदलेल याची कल्पना कुणालाच नव्हती, पण काळानं एकाएकी आपला डाव साधला आणि बेन्नूर सर जगाचा भूतकाळ झाले. १७ ऑगस्ट २०१८ रोजी हिंदू-मुस्लिम सामाजिक सौहार्दसाठी आयुष्यभर झटणाऱ्या बेन्नूर सरांनी अखेरचा निरोप घेतला. रात्री नऊ वाजता त्यांनी जगाला अंतिम अलविदा केला. ज्येष्ठ विचारवंत व राजकीय विश्लेषक म्हणून महाराष्ट्रात व देशात ख्यातकिर्त असलेले बेन्नूर सर एकाएकी काळाच्या पडद्याआड गेले.

शुक्रवारी रात्री आम्ही त्यांच्या मानपत्राची फ्रेम हाती घेऊन त्यावर चर्चा करत होतो. इतक्यात युसूफ बेन्नुरांनी दिलेली 'बुरी खबर' कानावर आदळली. मनाला हादरा देणारं वृत्त ऐकून आम्हा सर्वांचं अवसान गळालं. प्रा. बेन्नूर सर येत्या नोव्हेंबरला वयाची ८० वर्षे पूर्ण करणार होते, त्यांच्या गौरव ग्रंथाचंही काम सुरू होतं. या व्यतिरिक्त त्यांच्या चार पुस्तकांचं काम प्रगतीपथावर होतं. ही पुस्तके प्रकाशित होताना बघण्याची त्यांची फार इच्छा होती. एका मागोमाग एक पुस्तक येत आहेत, हा क्षण त्यांना सुखावणारा होता. पण दुर्दैवाने ते आपली पुस्तकं बघू शकले नाहीत.

सातारा शहराने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे अनेक नामवंत मंडळी दिली आहे. अशा सातारच्या भूमीत २५ नोव्हेंबर १९३८ ला प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांचा जन्म झाला होता. पंढरपूरच्या परिसरात ते लहानाचे मोठे झाले. उथळ व सवंग भाष्यकारांच्या कंपूत राहण्यापेक्षा उपेक्षित व एकटं राहिलेलं बरं, वादग्रस्त विधानं करून चर्चेत राहण्यापेक्षा विस्मृतीत असणं चांगलं, या विचारांना साजेसं प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांचं जगणं होतं. सुधारणावादी विचारवंत व राजकीय विश्लेषक म्हणून ते

Scanned by CamScanner

देशभरात ख्यातकिर्त होते. प्राध्यापक म्हणून त्यांनी नेहमी संशोधकवृत्ती जोपासली. त्यांनी विविध परिवर्तनवादी आणि प्रबोधनांच्या चळवळींशी स्वतःला जोडून घेतलं होतं. प्रत्येक चळवळीला त्यांनी वैचारिक व संस्थात्मक अधिष्ठान प्राप्त करुन देण्याचं काम केलं. अखिल भारतीय मराठी मुस्लिम साहित्य परिषद, मुस्लिम ओबीसी आंदोलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी (सातारा), हुतात्मा अकादमी (सोलापूर) इतिहास पुनर्लेखन समिती, महाराष्ट्रीयन मुस्लिम आरक्षण आंदोलन या संघटना व संस्थांच्या उभारणीत त्यांनी पुढाकार घेतला. संघटन बांधणी करत त्यांनी मुस्लिम समाजमनाला व्यासपीठ उपलब्ध करुन दिलं. तसंच दलित चळवळीतही त्यांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे. यासह बालभारती, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, राज्यशास्त्र परिषद, महाराष्ट्र गॅझेटिअर आदी अस्थापनावर त्यांनी आपल्या अनुभवांचा ठसा उमटवला आहे. देश-परदेशातही त्यांनी व्याख्यानं दिली आहेत.

बेन्नूर गेल्या सहा दशकांपासून राजकारण, समाजवाद, राष्ट्रवाद, गांधी विचारांवर सातत्यानं लिहीत आले आहेत. ते गांधीवाद, समाजवाद व साम्यवादाचे खऱ्या अर्थानं वाहक होते. या विचारांची अंधभक्ती करण्याऐवजी त्यांनी वेळेप्रसंगी कठोर चिकित्सादेखील केली आहे. इस्लाम आणि अरब जगत सरांचा आवडता विषय. सरांना साम्राज्यवादी अरब इतिहास तोंडपाठ होता. धर्मवाद्यांनी लादलेल्या रूढी परंपरा झुगारून दिल्याशिवाय कुठल्याही समाजाचा विकास शक्य नाही, असं त्यांचं ठाम मत होतं. धर्मवादी व हिंदुत्ववाद्यांनी उभा केलेला मुस्लिम एकजिनसीपणाचा भ्रम त्यांनी आपल्या लेखनातून सातत्यानं खोडून काढला. कुठल्याही धार्मिक दहशतवादामागे साम्राज्यवाद आणि त्याचं अर्थकारण दडलेलं असतं, त्याला जाणून घेतल्याशिवाय ती समस्या समजून घेणं शक्य नाही असा विचार त्यांनी लेखनातून सातत्यानं मांडला.

१९७० पासून त्यांनी सुधारणावादी लेखनाला सुरूवात केली. लष्करात क्लर्क, न्यायालयात कारकून अशा छोट्या-छोट्या नोकऱ्या केल्यानंतर ते १९६६ मध्ये राज्यशास्त्राचे प्राध्यापक झाले. लातूरच्या दयानंद महाविद्यालयात त्यांनी राज्यशास्त्राचे धडे दिले. समाजकारण व राजकारण शास्त्राचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. काहीच अवधीत ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक बनले. कौटुंबिक जबाबदारीमुळे त्यांना वर्षभरात जड अंतःकरणानं लातूर सोडावं लागलं. सोलापूरच्या संगमेश्वर महाविद्यालयात तब्बल ३२ वर्षे त्यांनी अध्यापन कार्य केलं. या व्यतिरिक्त त्यांनी राज्यातील विविध विद्यापीठात वारंवार व्याख्यानं दिली असून अनेक शोधनिबंधही सादर केलेली आहेत. राज्यभरात त्यांना

Scanned by CamScanner

अनेक चांगले विद्यार्थी लाभले. त्यांचे अनेक विद्यार्थी वेगवेगळी कॉलेज व विद्यापीठात अध्यापन कार्य करतात.

सामाजिक कार्याला सुरूवात केल्यापासून ते हमीद दलवाईंच्या संपर्कात आले; पण नंतरच्या काळात ते दलवाईंचे कठोर टीकाकार झाले. याबद्दल त्यांनी फ.म. शहाजिंदे संपादित 'मुस्लिम मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप' या पुस्तकात लिहिलंय. बेन्नूर म्हणतात, "१९६७ साली दंगलीच्या काळात एका व्याख्यानासाठी दलवाई सोलापूरला आले होते. दंगलीची एकतर्फी माहिती त्यांना देण्यात आली होती. चर्चेत दलवाई मुसलमानांचे ऐकून घ्यायला तयार नव्हते. ते सतत मुस्लिम लिग वृत्तीबद्दल बोलत होते. मी दोन्ही ठिकाणी हस्तक्षेप केला. त्यांनी चर्चेसाठी डॉ. अंत्रोळीकरांच्या घरी मला बोलाविले. चर्चेतही ते वस्तुस्थितीला सोडूनच बोलत राहिले. त्यानंतर सर्व मोहल्ल्यांतील काही मुसलमान व्यक्ती मला भेटायला आल्या. त्यांना दलवाईंचे एकांगी मत व प्रतिपादन मान्य नव्हते. दलवाईंना कोणीतरी वस्तुस्थिती समजावून सांगणे गरजेचे होते. तसा प्रयत्न करायचा विचार मी केला. नंतर माझ्या कॉलेजमध्ये व्याख्यानासाठी त्यांना निमंत्रित केले. कॉलेजमध्ये ठीक बोलले; परंतु शहरांतील सार्वजनिक सभांतून गोंधळ घातला. अपमानास्पद भाषेत दलवाई मुसलमानांबद्दल बरळत राहिले. त्यांच्या सभांना हिंदूंची गर्दी होऊ लागली. मुसलमानांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. या अनुभवानंतर मी इस्लामसंबंधी अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मुंबई, कोल्हापूर येथे दलवाईंनी घेतलेल्या परिषदांना गेलो. त्यांच्याशी संपर्क ठेवून चर्चा करण्याचे प्रयत्न केले. माझ्या लक्षात येऊ लागले की, दलवाईंचा राजकारण आणि समाजकारणाचा अभ्यास वर्तमानपत्री होता. त्यांनी कुठल्याच धर्माचा व्यवस्थित अभ्यास केलेला नव्हता. मुसलमानांबद्दल अ.भि. शहांचे मार्गदर्शन होते. राम गोपाल, आर.सी. मुजुमदार, करंदीकर एवढीच पुस्तके वाचली होती. सत्यशोधक मंडळाचे त्या काळचे कार्यकर्तेही तसेच होते. स्त्रियांबद्दल अन्याय होतो आहे, एवढ्याच ऊर्मीने ते जवळ आले होते. यदुनाथ थत्ते, गोविंद तळवलकर, बाबा आढाव यांच्या प्रभावाखाली ते होते. यदुनाथ थत्तेंना तर इतिहासही धड माहित नव्हता. ही सर्व मंडळी वसाहतवादी इतिहासावर पोसली गेली होती. तेवढ्यात किडनीच्या विकाराने दलवाई गेले. त्यांच्या दहनाचे मुस्लिम समाजव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाले. दलवाई गेल्यानंतर मी कोणाशी चर्चा करणार होतो ? सत्यशोधक मंडळाचा नाद सोडला. मंडळाच्या काही परिषदांना मी गेल्याने माझी प्रचंड अवहेलना झाली. मी हे सर्व का केले ? कोणी समजावूनच

Scanned by CamScanner

कधी घेतले नाही. आजही मला दलवाईंचा शिष्य म्हणून जनमानसात बदनाम केले जाते. वयाच्या या टप्प्यावरही मला विरोधकांच्या अशा प्रकारच्या टीका असह्य वेदना देऊन जातात. माझ्या टीकाकारांनी माझ्याविरोधात हा एकच मुद्दा घेऊन मुसलमानांत लोकप्रिय होण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे. मी सोलापूरला आल्यानंतर मुस्लिमांबद्दलच्या परिस्थितीचा अभ्यास सुरू केला. नरहर कुरुंदकरांचे जागर, शिवरात्र, इस्लाम आणि मुसलमानांचा विपर्यास करणारे होते. पु.भा. भावेंपासून श्रीपाद जोशींपर्यंत लोकांचे लिखाण नकारात्मक, एकतर्फी होते. दलवाईंनी मुस्लिम समाजसुधारणेला हात घातला होता म्हणून त्यांना दुसरी बाजू सांगण्याचा प्रयत्न केला. ते अखेरपर्यंत आपल्याच विश्वांत रमले. माझ्या लक्षात आले होते की, त्यांना इस्लामची फारच कमी माहिती होती. ते सरसकट सर्व मुस्लिमांना मुस्लिम लीग आणि उत्तर भारतांतल्या मुसलमानांची समीकरणे लावत होते. त्यांच्यासमोर मुसलमानांचे मोनोलिथ (एकसंघ जमात) होते. त्यांना सर्व मुसलमान जमातवादी वाटत. १९७४ नंतर मी त्यांच्याशी चर्चा करणे व त्यांना समजावण्याचा नाद सोडला. १९७९ साली मी मुस्लिम सत्यशोधक मंडळाला जाहीर आव्हान दिले. ज्या माणसाला काहीच येत नव्हते, त्याचा मी अनुयायी होणे शक्य नव्हते."

बेन्नूर सरांना मुस्लिम सत्यशोधक चळवळीबद्दल त्यांच्या अनेक तक्रारी होत्या. समीक्षक फ.म. शहाजिंदे यांनी 'मुस्लिम मराठी साहित्य एक दृष्टिक्षेप' या बेन्नूर लिखित आगामी पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात, 'इस्लाम धर्म, ईश्वर, धर्मग्रंथ आणि मुस्लिम प्रश्नांचा प्राधान्यक्रम याविषयी संभ्रमात टाकणाऱ्या दलवाईंच्या भूमिकेमुळे बेन्नूर सत्यशोधक मंडळात रममाण होऊ शकले नाहीत. यातून जे प्रश्न बेन्नूरांच्या पुढे उभे राहिले त्यांच्या सोडवणुकीतून त्यांनी धर्माचा, इतिहासाचा आणि मुस्लिम विचारवंतांचा अभ्यास केला.'

इस्लामच्या अभ्यासामुळे बेन्नूरसर दलवाई व त्यांच्या एकांगी विचारांपासून फार लांब गेले. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे पूर्वीचे अध्यक्ष अब्दुल कादर मुकादम यांचेही दलवाईंबद्दल असंच मत आहे. याच कारणावरून त्यांनी दलवाईंच्या संघटनेला अलविदा केला. दुसरे अध्यक्ष स्व. हुसेन जमादार यांनीही अखेरच्या काळात पत्रकार परिषद घेऊन मंडळापासून फारकत घेतली. पन्नास वर्षांनंतर का होईना त्यांना दलवाईंचे दहन करून घेणे पचनी पडलं नाही. दलवाईंची नास्तिकता नाकारून त्यांनी २० शाखाप्रमुखांसह मुस्लिम सत्यशोधक मंडळाला सोडचिठ्ठी दिली. (लोकसत्ता, २३ ऑक्टोबर

Scanned by CamScanner

२०१५)

दलवाईंच्या निधनानंतर बेन्नूर सरांनी सत्यशोधक चळवळीच्या एकांगी आणि नकारात्मक भूमिकेचा लेखनातून जाहीर प्रतिवाद केला. सत्यशोधक चळवळीचे नकारात्मक स्वरूप, इस्लामविरोधी भूमिका आणि मंडळातील प्रमुख कार्यकर्त्यांचे हिंदुत्त्ववादी मंडळींशी असणारे विशिष्ट प्रकारचे संबंध त्यावर त्यांनी जाहिरपणे टीका केली. तरीही सोलापूरातील मुस्लिम समाजानं त्यांना दलवाईवादी असल्याचा ठपका ठेवत बहिष्कृत केलं. बराच काळ समाज त्यांच्याशी अबोला धरून होता. दलवाईंच्या सोबतीबद्दल बेन्नूर यांनी सोलापूरकरांशी अनेकवेळा जाहीर माफीदेखील मागितली होती; पण सोलापूरकरांचा राग कमी झाला नाही. माझ्याच समाजानं मला नाकारलं ही सल अखेरपर्यंत तशीच राहिली. मी सोलापूरकरांचा सन्मान स्वीकारणार नाही अशी त्यांनी भूमिका घेतली आणि तो शब्द खरा करुनही दाखवला.

दलवाईंशी फारकत घेतल्यानंतर ते मोईन शाकीर व असगरअली इंजिनिअर यांच्यासोबत एकता चळवळीत सक्रिय झाले. ऐंशीच्या दशकात त्यांनी दलित पँथर चळवळीत काम केलं, चळवळीच्या प्रसारासाठी त्यांनी सोलापूर व परिसरात परिश्रम केलं. डॉ. कुमार सप्तर्षींच्या युवक क्रांती दलातही ते सक्रिय झाले. युक्रांदमध्ये मेडिकलच्या विद्यार्थ्यांचा प्रश्न त्यांनी लावून धरला. मुस्लिम प्रबोधनाच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिलं. सोलापूरात त्यांनी डाव्या व कामगार चळवळीतही दीर्घकाळ काम केलं. असगरअलींना घेऊन महाराष्ट्रभर हिंदु-मुस्लिम एकता व सामाजिक सौहार्दासाठी व्याख्यानं दिली. दंगलग्रस्त भागांना भेटी देणं, पीडित कुटुंबाला आधार देणं आदी कामं सरांनी केली. असगरअली व इतर संघटनासोबत त्यांनी राज्यातील अनेक हिंदु-मुस्लिम दंगलीचे सत्यशोधन अहवाल तयार करून दंगलीचं मॉड्यूल व त्यावरील उपाययोजना समोर आणल्या.

१९८९ साली त्यांनी अजीज नदाफ, लतिफ नल्लामंदू व मुबारक शेख या सहकारी मित्रांसोबत 'मुस्लिम मराठी साहित्य परिषदे'ची स्थापना केली. या साहित्य चळवळीतून त्यांनी प्रथमच 'मराठी मुस्लिम'ची व्याख्या त्यांनी रुजवली. शाहबानो, राम जन्मभूमी आंदोलन व बाबरी विध्वंसानंतर मुस्लिम समाज अस्थिर व अस्वस्थ झालेला होता. मुंबई दंगलीनंतर महाराष्ट्रात मराठी मुसलमानांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला, अशा काळात मुस्लिम मराठी साहित्य परिषदेनं हवालदिल झालेल्या मराठी

Scanned by CamScanner

मुसलमानांना सावरण्याचं काम केलं.

या साहित्य चळवळीतून अनेक मुस्लिम लेखक लिहिते झाले. फ.म. शहाजिंदे, अजीज नदाफ, अब्दुल कादर मुकादम, बाबा मोहम्मद आत्तार, बशीर मुजावर, एहतेशाम देशमुख, जावेद कुरेशी, युसूफ बेन्नूर, मुबारक शेख, अनवर राजन, रफिक सूरज, राजेखान शानेदिवाण, अक्रम पठाण, नसीम देशमुख इथंपासून ते आजच्या काळात लिहित असलेले माझ्यासह अनेकजण या साहित्य चळवळीचं फलित आहे. एका अर्थानं मराठी मुसलमानांना ताठ मानेनं जगण्याचं बळ या चळवळीनं दिलं. सरांनी अलीकडे नवीन लेखक तयार करण्याचं काम हाती घेतलं होतं. एखादा विषय देऊन त्यांच्याकडून सकस लिहून घेण्याचं दिव्य सरांनी पेललं. ह्यात पठाण, अक्रम पठाण, सरफराज अहमद ही नवीन मंडळी सरांमुळे लिहिते झाली. आज यांसारखी अनेक राजकीय, सामाजिक प्रश्नांवर सकस व दर्जेदार लेखन करत आहेत. या मंडळींनी वेगवेगळ्या पातळीवर आपल्या मुक्त लेखनाचा ठसा उमटवला आहे.

मुस्लिम मराठी साहित्य परिषदेतून सुफी व संतकवींचा इस्लाम व हिंदु-मुस्लिम समन्वयाचा विचार नव्यानं मांडण्यात आला. ५० पेक्षा जास्त मुस्लिम मराठी संतकवींच्या रचना या साहित्य परिषदेनं प्रकाशात आणल्या. इतर संघटनांप्रमाणे धार्मिक विचार मांडण्याऐवजी मराठी मुसलमानांचा 'जगण्यातला इस्लाम' या साहित्य चळवळीतून त्यांनी प्रकर्षानं मांडला. मुसलमानांचे सामाजिक व धार्मिक प्रश्न वेगवेगळे आहेत, त्यात सरमिसळ करता कामा नये असा विचार त्यांनी सातत्यानं मांडला. (बेन्नूर, लोकमत, दिवाळी, २०००)

मुस्लिम मराठी साहित्य चळवळीतून प्रथमच मुसलमानांतील जातिप्रथेवर प्रहार केला गेला. अनेक उलेमा व धर्मवाद्यांनी मुस्लिमातच जातिप्रथा नाही, तुम्ही नव्यानं मांडणी करू नका म्हणत चळवळीला खोडा घालण्याचा प्रयत्न केला. नागपूरला १९९२ साली झालेलं मुस्लिम मराठी साहित्य संमेलन याच विषयाला अनुसरून होतं. मुस्लिम जातीभेदावर आधारित एका परिसंवादातून पुढे 'मुस्लिम ओबीसी' चळवळीची स्थापना झाली. १९९५-९६ पर्यंत राज्यभर या चळवळीचं काम पसरत गेलं. महाराष्ट्रात ओबीसी मुसलमानांची मोठी चळवळ उभी राहिली. बेन्नूर सरांनी मराठी-हिंदीत व असगर अली इंजिनिअर, प्रफुल्ल बिडवई यांनी मुस्लिम ओबीसींच्या प्रश्नांवर इंग्रजीत सातत्यानं लिहीलं. मुस्लिम ओबीसी चळवळीनं उत्तर भारतात मागास मुसलमानांच्या आंदोलनाला बळ दिलं. बिहारमधील 'पसमांदा मुस्लिम आंदोलन' याच प्रेरणेतून पुढे आलं. (बेन्नूर,

Scanned by CamScanner

सुगावा, फेब्रुवारी २००२) पसमांदा आंदोलनानं देशाला दोन खासदार दिले, तर मुस्लिम ओबीसी चळवळीनं महाराष्ट्रातील मागास मुसलमानांनी नव्यानं गणती करून त्यांना शासकीय सवलती देऊ केल्या. २००६ साली स्थापन झालेल्या सच्चर समितीनं मुस्लिम ओबीसी चळवळीचे प्रश्न व समस्या लक्षात घेऊन मुस्लिमांना आरक्षणाची तरतूद केली. (बेन्नूर, समाज प्रबोधन पत्रिका, जुलै २०००)

२०१६ साली महाराष्ट्रीयन मुस्लिम आरक्षण आंदोलन नावाची चळवळ बेन्नूर सरांच्याच प्रयत्नानं उभी राहिली. या चळवळीने राज्यभर मुस्लिम आरक्षण, स्कॉलरशिप, आर्थिक विकास महामंडळे, शिक्षणातील सवलतींची मागणी लावून धरली आहे. मराठा क्रांती मोर्चानंतर बेन्नूर सर पुन्हा एकदा आरक्षण आंदोलनात सक्रिय झाले होते. देशातील ७० टक्के मुस्लिम दारिद्र्यरेषेखाली असून त्यांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला 'समाज' म्हणून आरक्षण देण्याची मागणी केली. मुस्लिम आरक्षणासाठी सर्व जातिसमुहांनी एकत्रित लढा उभारण्याची गरज असल्याचा विचारही त्यांनी मांडला. (मटा, २९ ऑगस्ट २०१६)

प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांनी राजकीय विश्लेषक व विचारवंत म्हणून केलेलं लेखन अतुलनीय आहे. १९९८ साली त्यांनी 'भारतीय मुसलमानांची मानसिकता आणि समाजरचना' नावाचा छोटासा ग्रंथ लिहिला. या पुस्तकात त्यांनी गैरमुस्लिमांना इस्लामच्या दृष्टिकोनातून नव्हे, तर एक 'समाज' म्हणून मुस्लिमांना समजून घेण्याची विनंती केली. भारतीय मुस्लिम अरबांसारखा एकजिनसी नसून पूर्णतः वेगळा आहे. त्याचं जगणं, खाणं, वेशभूषा, आचरण पद्धती पूर्णतः अरबांपेक्षा भिन्न आहे. भारतीय मुसलमानांत हिंदुप्रमाणे जातिव्यवस्था आहे, तसेच ते भारताच्या प्रादेशिक अस्मितांशी घट्ट बांधलेले आहेत, हा महत्त्वाचा विचार बेन्नूर सरांनी पुस्तकातून मांडला. यात त्यांनी हजारो वर्षांपूर्वी धर्मांतरीत झालेल्या मुस्लिम समुदायाची प्रादेशिक मानसिकता रेखाटली आहे. मुसलमानांचं राहणं, धर्मपालन, वेशभूषा, भाषा, प्रादेशिक ओळख आदी बाबींवर प्रकाश टाकला. मुस्लिमांची भारतीय / महाराष्ट्रीयन 'समाज' ओळख प्रस्थापित केली. लोकसंख्या वाढीचं मिथक, कुटुंबनियोजन, धर्मपरंपरा, रितीरिवाज इत्यादी घटकांवर सुधारणावादी दृष्टिकोनातून सविस्तर विवेचन केलं. हे पुस्तक डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी हिंदीत अनुवादीत केलं. हिंदीत गेल्यानंतर या पुस्तकाची देशपातळीवर चर्चा सुरू झाली. २००४ साली या पुस्तकाला हिंदीचे ज्येष्ठ साहित्यिक उदयप्रकाश यांच्या हस्ते २००३ चा 'पहल सन्मान' देऊन गौरव करण्यात आला. हिंदीचे प्रसिद्ध समीक्षक

Scanned by CamScanner

कमलेश्वर यांनीही मुसलमानांचे पहिल्यांदा इतके सटीप आकलन मांडल्यावरून सरांचं कौतुक केलं होतं. २०१२ साली या पुस्तकात आणखीन नव्यानं भर घालून सुधारित आवृत्ती काढण्यात आली. हे पुस्तक उर्दू भाषेतही अनुवादीत झालेलं आहे.

'हिंदुत्व, मुस्लिम आणि वास्तव' हे त्यांचे दुसरं सर्वात जास्त गाजलेलं पुस्तक. यात कट्टर हिंदुत्वाचे विवेकी समाजाला कशाप्रकारचे धोके आहेत, याचं सविस्तर विवेचन केलं आहे. वंदे मातरम्‌चा वाद, लोकसंख्या वाढीचं मिथक, दहशतवादाचे राजकारण आदी समस्यांसह धर्मवादी मुस्लिम मानसिकतेची चिकित्सा त्यांनी केली आहे. २०१२ साली प्रकाशित झालेल्या 'आधुनिक भारतातील मुस्लिम राजकीय विचारवंताचे राष्ट्रविषयक चर्चाविश्व' या पुस्तकातून उपेक्षित राहिलेल्या राजकीय विचारवंतावर सरांनी प्रकाश टाकला आहे. आलम खुंदमिरी, हसरत मोहानी, एम.ए. अन्सारी, के.एम. अशरफ व रफिक झकेरिया आदी विचारवंतानी भारताच्या सेक्युलर राजकारणाला दिशा दिली; पण ते शेवटपर्यंत उपेक्षितच राहिले अशी खंत त्यांनी मांडली. स्वातंत्र्यानंतरपासून भारतात मुस्लिम राजकारणाची होणारी कोंडी त्यांनी सुक्ष्म पद्धतीनं या ग्रंथात हाताळली आहे. मुस्लिम राजकारणाची नव्यानं व्याख्या करत उमेदीच्या नेतृत्व निर्मितीच्या प्रक्रियेवर त्यांनी भर दिला आहे.

२०१० साली प्रकाशित झालेलं त्यांचं 'महात्मा गांधीप्रणित इतिहासशास्त्र आणि हिंद स्वराज्य एक अन्वयार्थ' हे डोळस गांधीवादाची मांडणी करणारे महत्त्वाचं पुस्तक आहे. या ग्रंथातून त्यांनी गांधींच्या प्रत्येक टीकाकारांना त्यांच्याच भाषेत चोख उत्तर दिलंय. महात्मा गांधींचा वसाहतवादी इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन, धर्म आणि मुस्लिम समुदायाचं आकलन तटस्थपणे सरांनी मांडलं आहे. गांधी अनुयायांनी गांधींना सोयीस्कररित्या वापरलं, त्यामुळे गांधी विचाराचा प्रसार खुंटला अशी खंत बेन्नूर या पुस्कात व्यक्त करतात. महात्मा गांधीना येत्या ऑक्टोबरमध्ये दीडशे वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्तानं गांधीवाद्यांनी या पुस्तकाची नव्यानं उजळणी करायची गरज आहे.

आत्तापर्यंत त्यांची एकूण सात पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. ज्यात वर उल्लेख केलेल्यांशिवाय 'आधुनिक भारतातील मुस्लिम विचारवंत', 'गुलमोहर' (कवितासंग्रह), 'सुफी संप्रदाय आणि वाङ्मय विचार' इत्यादी अशी पुस्तके आहेत. दोन महिन्यापूर्वी 'भारत के मुस्लिम विचारक' हे हिंदी पुस्तक प्रकाशित झालेलं आहे. त्यांची आगामी चार पुस्तके खूप महत्त्वाची आहेत, त्यात पहिले पुस्तक 'राष्ट्रवाद, साम्राज्यवाद आणि इस्लाम', दुसरं - 'मुस्लिम मराठी साहित्य : एक दृष्टिक्षेप', तिसरं

Scanned by CamScanner

- 'मुस्लिम समाज : अपेक्षा आणि वास्तव' आणि चौथं म्हणजे 'मुस्लिम राजकारणावर' असलेलं पुस्तक. गेल्या काही महिन्यापासून या पुस्तकाच्या निर्मितीप्रक्रियेवर सर लक्ष ठेवून होते. त्यांचं आत्मचरित्रही प्रकाशनार्थ आहे. मी स्वतः या सर्व पुस्तकाच्या संपादनात गेल्या वर्षभरापासून रमलो आहे.

स्वातंत्र्य आंदोलन, फाळणी, साम्राज्यवाद, जागतिकीकरण, इतिहासशास्त्र, वसाहतवाद, दहशतवादाची सडेतोड चिकित्सा बेन्नूर सरांनी केली आहे. इतिहासशास्त्रावर त्यांनी केलेलं काम वादातित आहे. नुकतंच त्यांनी इतिहासशास्त्रावर आधारित सरफराज अहमद लिखित 'मध्ययुगीन मुस्लिम विद्वान' या पुस्तकाची दीर्घ प्रस्तावना त्यांनी महिनाभरापूर्वी लिहिली. यात त्यांनी वसाहतवादी इतिहासाला मुस्लिमांनी ॲकेडमीक पद्धतीनं उत्तर देण्याची गरज बोलून दाखवली आहे. त्यांनी अनेक मासिके, साप्ताहिके, दैनिकं व पाक्षिकात एक हजारपेक्षा जास्त लेख लिहिले आहेत. ते मासिकांच्या लिखाणात इतके रमले की त्याच्या लेखांवर येणाऱ्या प्रतिक्रियांवर ते वादविवाद करू लागले, वेगवेगळ्या प्रतिक्रियांना उत्तरे देऊ लागले. कदाचित यामुळेच त्यांचं स्वतःच्या पुस्तक निर्मिती प्रक्रियेकडे दुर्लक्ष झालं असावं. सरांनी आपल्या एकाही लेखाचं संकलन केलेलं नाही. त्यामुळे आम्ही 'गाजियोद्दीन रिसर्च सेंटर'च्या माध्यमातून विविध ठिकाणी लिहिलेल्या सरांच्या लेखांचं संकलन करत आहोत. वाचक, मित्र, सहकाऱ्यांच्या स्मरणात, वाचनात व संग्राह्य असलेले बेन्नूर सरांचे लेख संपादक व लेखकाच्या निदर्शनास आणून द्यावेत.

अलीकडे तर सरांनी एकामागोमाग एक असे लेख लिहिण्याचा धडाका लावला होता. डिसेंबर-जानेवारीत त्यांनी तब्बल चार दीर्घ लेख लिहिले होते. या व्यतिरिक्त हिंदु-मुस्लिम सामाजिक समन्वयावर एक पुस्तक लिहिण्याचं बोलून दाखवलं होतं. योगेंद सिंकद, सबा नकवी यांनी मांडलेली गंगा-जमनी परंपरेची कल्पना मराठीत यायला हवी अशी त्यांची इच्छा होती. तलाक संदर्भात मोदी मीडियात सुरू असलेल्या मुस्लिमविरोधातील चिखलफेकीमुळे ते फार व्यथित होते. अलीकडे सरांसोबत माझ्याही भेटी वाढल्या होत्या. माझ्या घरापासून त्यांचं घर काही अंतरावरच होतं. आम्ही तासंतास नवीन विषयावर बोलत असू. सोलापूरहून सरफराज अहमद आले, की आमची दीर्घ बैठक चाले. फेब्रुवारीत ते पुण्यातून सोलापूरला गेले. लवकर परत येऊन नवीन प्रोजेक्टवर काम करणार अशी भावना त्यांनी बोलून दाखवली. गाजियोद्दीन रिसर्च सेंटरच्या कामानं ते समाधानी होते. मार्चमध्ये सर औरंगाबादला गेले. वॉशरुममध्ये घसरुन पडण्याचं निमित्त झालं. सरांचा किडनीचा आजार बळावत गेला. सोलापूरला जाऊन त्यांनी अंथरूण धरलं. हळूहळू त्यांची तब्बेत बरी होत होती. त्यांनी पुन्हा

Scanned by CamScanner

लिहिण्याची काम सुरू केलं होतं. त्यांची नवीन पुस्तके लवकरात लवकर यावीत अशी त्यांची इच्छा होती.

२०१४ नंतर भारतात अल्पसंख्य व मुस्लिम समाजाच्या अस्मिता व धार्मिक प्रतिकांवर हल्ले होत आहेत. गोरक्षेच्या नावानं दलित, मुस्लिम आणि मागास समुदायातील लोकांची मॉब लिचिंग केली जात आहे, अल्पसंख्य समुदायात असुरक्षितेची भावना बळकट होत आहे, उजवा विचार जमातवाद प्रबळ होंताना कार्पोरेट व प्रसारमाध्यमामध्येही जातीयवादी वृत्ती वाढली आहे. अशा परिस्थितीत सामाजिक सौहार्द व हिंदु-मुस्लिम समन्वयाचा विचार मांडणे गरजेचं झालं आहे. गेल्या पाच दशकांपासून प्रा. फकरुद्दीन बेन्नूर हा विचार मांडत होते. एकाएकी त्यांच्या जाण्याने फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एकाएकी सरांच्या जाण्यानं महाराष्ट्राच्या प्रबोधनवादी चळवळीचं प्रचंड मोठं नुकसान झालं आहे. भारतीय समाजात हिंदु-मुस्लिम सौहार्दची संकल्पना प्रत्यक्षात राबवणारा कर्ता कार्यकर्ता महाराष्ट्रानं गमावला आहे. हिंदु-मुस्लिम समन्वय व सौहार्दतेचं त्यांचं काम अर्धवट राहणार नाही याचा प्रयत्न तुम्हा आम्हा सर्वांना करण्याची गरज आहे.

□□□

विचारशलाका

संपादक: प्रा. नागोराव कुंभार

'आई' शिवनगर, सुतमिल मार्ग,

लातूर - ४१३ ५१२ फोन : (०२३८२) २४८१६७, मो. : ९४२२९४९९६६

विचारशलाका अंकात आपण जाहिरात द्यावी व

इतरांनाही द्यावयास सांगावे

- जाहिरात दर -

कृष्णधवल पूर्ण पेज	:	६०००/- रुपये
बाहेरील मलपृष्ठ	:	१५०००/- रुपये
आतील मलपृष्ठ २ व ३	:	१२०००/- रुपये
विशेष रंगीत पृष्ठ	:	१००००/- रुपये

Scanned by CamScanner